# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- ११/निवडणूक निरिक्षक /कार्य/ ११४२५ /सन २०२०. दिनांक : /२/२०२०. 17 MAR 2020

**वाचले** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) .

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (सीबी) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निहित केलेले आहेत.

ज्या अर्थी, वाचले क्र. २ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेचे निरिक्षण करण्यासाठी निवडणुक निरिक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. निवडणूक निरिक्षकांना प्राधिकरणाचे कान व डोळे म्हणून भूमिका पार पाडावयाची असल्यामुळे निवडणूक निरिक्षकांची निवडणूक प्रक्रियेचे निरिक्षण करण्यासाठी कामे / जबाबदारी निश्चित करणे आवश्यक झालेले आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश पारीत करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, निवडणूक निरिक्षकांची कामे/जबाबदारी निश्चित करणे बाबत प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (सीबी) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण निवडणूक निरिक्षकांची निवडणूक प्रक्रियेचे निरिक्षण करण्यासाठी कामे / जबाबदारी खालील प्रमाणे निश्चित करीत आहे.

१. नामनिर्देशन प्रक्रियेचे निरिक्षण :-
   - निवडणूक निर्णय अधिकारी (नि.नि.अ.) यांनी नामनिर्देशन पत्र वितरण व स्वीकृती केली आहे किंवा कसे.
   - नि.नि.अ. यांनी निवडणूकीबाबत आवश्यक ती प्रसिध्दी दिलेली आहे काय याबाबतची खात्री करून मतदानाची जास्तीत जास्त टक्केवारी होण्याकरीता प्रयत्न केलेले आहेत काय याबाबत शहानिशा करावी.
   - प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी नि.नि.अ.यांनी वेळच्या वेळी व मंजूर निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या विहीत वेळेवर प्रसिध्द केली आहे काय याची शहानिशा करावी.
   - प्राप्त नामनिर्देशन पत्रांवर नि.नि.अ.यांनी प्राप्त नामनिर्देशन पत्राचा क्रमांक व दिनांक आणि वेळ नमुद केली आहे काय याची शहानिशा करावी.

२. नामनिर्देशनपत्र छाननी प्रक्रियेचे निरिक्षण :-
   - नामनिर्देशन पत्रांची छाननी स्वत: नि.नि.अ. यांनी केली आहे काय याची शहानिशा करावी.
   - छाननीवेळी संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गंभीर स्वरुपाच्या दोषावरुन नामनिर्देशन पत्र नामंजूर केलेले आहे कि, किरकोळ त्रुटींकरीताही नामनिर्देशन पत्रे नामंजूर केलेली आहेत याचे निरीक्षण आवश्यक आहे.
   - नि.नि.अ. यांनी नामनिर्देशन पत्रावर नामंजूर/मंजूर शेरा नमुद करुन स्वाक्षरी केली आहे काय याची शहानिशा करावी.
   - नि.नि.अ.यांनी प्राप्त आक्षेपांची संक्षिप्त चौकशी केली आहे काय ?
   - नि.नि.अ.यांनी म्हणणे सादर करण्यास संबंधीत नामनिर्देशीत व्यक्तीस संधी दिली काय ?

- संधीची मुदत संपल्यानंतर नि.नि.अ.यांनी निर्णय दिला काय ?
- छाननी कामकाजाचे नि.नि.अ. यांनी इतिवृतांत केला आहे काय ?
- नामंजूर नामनिर्देशन पत्रांचा अहवाल कारणांसह प्राधिकरणास/ जिसनिअ यांना सादर केला आहे काय ?

३. नामनिर्देशन पत्र मागे घेणेच्या प्रक्रियेचे निरिक्षण :-

- नामनिर्देशन पत्र माघारीकरीता संबंधीत उमेदवाराने नमुना ई - ६ मधील नोटीसीवर स्वाक्षरी केली आहे काय ?
- नोटीस संबंधीत उमेदवाराने अथवा सुचकाने स्वत: निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर सादर केली आहे काय ?.
- नोटीस सादर करण्याकरीता संबंधीत उमेदवाराने सुचकास लेखी स्वरूपात प्राधिकृत केले आहे काय.
- नोटीस स्वीकारतांना नि.नि.अ. यांनी नोटीशीचा खरेपणा व नोटीस देणाऱ्या व्यक्तीची ओळखीबाबत खात्री केली आहे काय ?
- नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची नोटीस दुपारी ३.०० वाजण्यापुर्वी नि.नि.अ. यांच्यासमोर सादर केलेली आहे काय.
- नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे नोटीशीवर नि.नि.अ.यांनी दिनांक, वेळ नमुद करुन स्वाक्षरी केली आहे काय.
- अपवादात्मक परिस्थितीमध्ये नोटीस रद्द करण्याची मुभा नि.नि.अ.यांनी दिली आहे काय.

४. निवडणूक चिन्ह वाटप प्रक्रियेचे निरिक्षण :-

- नि.नि.अ.यांनी प्रथम आलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य या तत्वानुसार निवडणूक चिन्ह वाटप केले आहे काय ?
- नि.नि.अ.यांनी वाटप केलेले चिन्ह हे संबंधीत उमेदवारास कळविले आहे काय.
- नि.नि.अ.यांनी भारतीय निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेले मुक्त चिन्ह वाटप केले आहे किंवा कसे ?
- नि.नि.अ.यांनी अंतीम उमेदवारांची चिन्हांसह ई ७ नमुन्यातील यादी वर्णानुक्रमानुसार प्रसिध्द केली आहे किंवा कसे ?.

५. मतदानापुर्वी निवडणूक प्रक्रियेतील पात्र उमेदवाराचे निधन होणे. :- मतदानापुर्वी उमेदवाराचे निधन झाल्याच्या खात्री अंती मतदानाबाबत नि.नि.अ.यांनी प्रत्यादेश दिल्याची बाब प्राधिकरणास अवगत करणे.

६. मतदान पुर्व व्यवस्थापन :-

- छपाई करण्यात आलेल्या मतपत्रिका हया ई - १० मध्ये वर्णानुक्रमानुसार आहेत किंवा कसे ?
- मतपत्रिकेवरील छापलेले उमेदवारांचे नाव व नि.नि.अ. यांनी उमेदवारास वाटप केलेले चिन्ह योग्य आहे किंवा कसे ?
- नि.नि.अ.यांनी पुरेसे, मतदारांकरीता सोईचे व निवडणूक प्रक्रिया राबविण्याकरीता सुरक्षीत मतदान केंद्र उभारले आहेत किंवा कसे ?
- मतदान केंद्रावर पुरेसा अधिकारी/कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती केली आहे काय.
- संवेदनशील मतदान केंद्र शोधणे व त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था कायम राहिल या दृष्टीने योग्य नियोजन करणे.
- मतदानाकरीता निश्चीत केलेले बूथ हे वयोवध्द व अपंगांना मतदानाकरीता येण्यास सोयीस्कर होईल काय् ते तळमजल्यावर आणि रँम्पसह आहेत काय याबाबतची पाहणी करणे.

७. अंतीम मतदार यादी व्यवस्थापन :- मतदानावेळी वापरण्यात येणारी अंतीम मतदार यादी व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी अंतीम केलेली मतदार यादी एकच आहे किंवा कसे ? याची खात्री करणे.

८. मतदान प्रक्रियेचे निरिक्षण :-

- मतदान निर्धारीत वेळेत सुरू होते किंवा कसे याची खात्री करणे.
- मतदान केंद्रावरील व्यवस्थेची पाहणी करणे.
- मतदानावेळी मतदारांची ओळख पटवली जाते किंवा कसे याची खात्री करणे.

- निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणुकीच्या संबंधातील अपराध,भ्रष्टाचार, मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक, मतदानाबाबतच्या गोपनियतेचा भंग इ. बाबी घडणार नाहीत याबाबत प्राधान्याने पाहणी करणे.
- मतदानाची टक्केवारी ठरवीक कालावधीनंतर संबंधीत जिसनिअ / तासनिअ यांना अवगत करणे.
- मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद केल्या आहेत किंवा कसे याची खात्री करणे.
- मतदानानंतर मतपत्रिकांचा हिशोब मतदान प्रतिनिधींना दिला किंवा कसे ? याची खात्री करणे.
- मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतदान विहीत मुदतीमध्ये समाप्त झाले किंवा कसे ? याची खात्री करणे.
- मतदानानंतर सीलबंद मतपेटयांची वाहतूक व मतमोजणीपर्यंत त्याची आवश्यक सुरक्षीतता याबाबत योग्य उपाययोजनांची व्यवस्था केलेली आहे काय याबाबतची खात्री करणे.
- संबंधीत सहकारी संस्थेच्या बाबतीमध्ये आवश्यकता विचारात घेऊन, पूर्वइतिहास व सभासदांमधील गटबाजी याबाबी विचारात घेऊन सीलबंद मतपेटया ठेवलेल्या स्ट्राँगरूमभोवती पोलीस बंदोबस्त, निर्मन्युष्य जागा व सी.सी. टि.व्ही आणि त्याच्या चित्रीकरणाचे थेट प्रक्षेपण करण्याकरीता स्क्रीनची व्यवस्था केलेली आहे काय याबाबतची खात्री करणे.

९. मतमोजणी प्रक्रियेचे निरिक्षण :-

- मतमोजणी निर्धारीत वेळेवर सुरु झाली काय, मोहरबंद मतपेटया मतमोजणी प्रतिनिधी समक्ष उघडल्या आहेत किंवा कसे याची खात्री करणे.
- मतमोजणीकरीता उमेदवारांकडून प्राधीकृत करण्यात आलेल्या प्रतिनिधीकडून भ्रमणध्वनी किंवा अन्य पध्दतीने मतमोजणीचे प्रक्रियेच्या गोपनियतेचा भंग होणार नाही याबाबतची दक्षता नि.नि.अ. यांनी योग्य उपाययोजना केलेली आहे काय याबाबतची शहानिशा करावी.
- मतपेटीतील मतदानाकरीता वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या मतदानाकरीता वापरलेल्या मतपत्रिकेच्या हिशोबांशी जुळते किंवा कसे याची खात्री करणे.
- नि.नि.अ.यांनी मतदान केंद्रनिहाय मतमोजणी केली आहे किंवा कसे याची खात्री करणे.
- मतमोजणीची प्रक्रिया ही मतमोजणीकरीता उमेदवारांनी प्राधीकृत केलेल्या प्रतिनिधीच्या समक्ष होते किंवा कसे याची खात्री करणे.
- नि.नि.अ.यांनी बाद मतपत्रिकांवर "बाद" असे अक्षर नोंदवून बाद केल्याचे संक्षिप्त कारण नमुद केले आहे किंवा कसे याची खात्री करणे.
- नि.नि.अ.यांनी मतमोजणीची प्रक्रिया सतत सुरू ठेवलेली आहे किंवा कसे याची खात्री करणे.
- मतमोजणी तहकुब केली आहे किंवा कसे, तसेच तहकुब करण्यात आलेली मतमोजणी निर्धारीत वेळेत सुरू झाली किंवा कसे याची खात्री करणे.
- कोणत्याही मतपेटीत फेरफार झालेला नाही अशी नि.नि.अ.यांनी खात्री केली आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करणे.
- फेरफार झालेले मतदान निरर्थक घोषीत करून नव्याने मतदान घेणे बाबत प्राधिकरणास / जिसनिअ यांना अवगत केलेले आहे काय.?
- मतमोजणी झाल्यानंतर नमुना ई - १६ मधील निकाल पत्रात अचुक नोंदी होत आहेत किंवा कसे याची खात्री करणे.
- उमेदवारांना सारखी मते पडल्यास चिटटया काढून निकाल जाहिर होतो किंवा कसे याची खात्री करणे.
- फेर मतमोजणी करीता लेखी मागणी झाली होती किंवा कसे याची खात्री करणे, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निकाल घोषित केला किंवा कसे याची खात्री करणे.

१०. आचार संहिता अंमलबजावणी :-

- नामनिर्देशनाचा कार्यक्रम सुरू होण्याच्या दिनांकापासून ते मतदान संपेपर्यंतच्या कालावधीत संबंधीतांकडून आचार संहितेचे पालन होते किंवा कसे याची खात्री करणे.
- आचार संहितेच्या कालावधीत संस्थेचे वाहन पदाधिका-यांकडून / सभासदाकडून वापरले जात आहे किंवा कसे याची शहानिशा करणे.

- ➢ आचार संहितेच्या कालावधीत संस्थेचे सेवक संस्थेच्या निवडणूकीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग घेणार नाहीत याची खात्री करणे.
- ➢ जाहिर प्रचार मतदान सुरू होण्यापुर्वी २४ तास अगोदर बंद झाला आहे काय याबाबतची शहानिशा करणे.
- ➢ आचारसंहिता कालावधीमध्ये संबंधीत संस्थेच्या विश्रामगृहाचा वापर करून आचारसंहितेचा भंग होत आहे काय याबाबतची शहानिशा करणे.

११. भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराध :- निवडणूकी दरम्यान भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराधा संदर्भात प्राधिकरणास अवगत करणे.

१२. कायदा व सुव्यवस्था यांचे व्यवस्थापन :-

- ➢ मतदान व मतमोजणीकरीता पुरेसा पोलीस बंदोबस्त होता किंवा कसे ? याची खात्री करणे.
- ➢ निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याबाबत योग्य ती उपाययोजना अंमलात आणलेली आहे काय याबाबतची खात्री करणे.
- ➢ निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सदर बाबत तात्काळ प्राधिकरणास अवगत करणे.

१३. मतदान व मतमोजणी प्रशिक्षण :- निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना मतदान व मतमोजणी अनुषंगाने आवश्यक प्रशिक्षण दिले आहे किंवा कसे ? याची खात्री करणे.

१४. निवडणूक निरिक्षकांना सहाय्य :-

- ➢ आवश्यकतेप्रमाणे निवासाची व्यवस्था / वाहन उपलब्धता करणे, प्राधिकरणाकडील परिपत्रके/ आदेश/ सुचना अवगत करणे.
- ➢ नियुक्त कर्मचाऱ्यांची यादी भ्रमणध्वनीसह अवगत करणे.
- ➢ निवडणूकीकरीता निर्धारीत करण्यात आलेली तसेच त्यामधील संवेदनशील मतदान केंद्राची माहिती अवगत करणे.
- ➢ मतमोजणी जागा कळवणे, अंतीम मतदार यादी उपलब्ध करणे, निवडणूक कार्यक्रम उपलब्ध करणे हे संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व नि.नि.अ.यांचे कर्तव्य असेल.

१५. निवडणूक विषयक उपरोक्त माहिती प्राप्तीनंतर फिरती कार्यक्रम तयार करुन जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, नि.नि.अ.यांना अवगत करणे निवडणूक निरिक्षक यांना बंधनकारक आहे. फिरती कार्यक्रमात प्रशिक्षणास हजर राहणे, मतदान केंद्रास भेटी देणे इ. आवश्यक बाबींचा प्रामुख्याने समाविष्ट असणे आवश्यक आहे.

१६. निवडणूक प्रक्रियेचे निरिक्षण करुन या आदेशासोबत जोडलेला अहवाल क्रमकं १, अहवाल क्रमांक २, अहवाल क्रमांक ३ व अहवाल क्रमांक ४ विहित मुदतीत प्राधिकरणास सादर करणे निवडणूक निरिक्षकांवर बंधनकारक आहे.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

१७/०३/२०२०

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.   /सन २०२०, दिनांक सोबत जोडलेले परिशिष्ट

अहवाल क्र. १ 11425 17 MAR 2020

(अंतीम उमेदवारांची यादी चिन्हांसह प्रसिध्द झाल्यानंतर २४ तासांचे आत सादर करावयाचा अहवाल)

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक निरिक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | सहकारी संस्थेचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरिक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | नामनिर्देशन प्रक्रिया | |
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मुदतीत नामनिर्देशन पत्र वितरण व स्वीकृती केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वेळच्या वेळी प्रसिध्द केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | प्राप्त नामनिर्देशन पत्रांवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी क्रमांक व दिनांक नमुद केला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ४. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्र तपासून लेखन अथवा तांत्रिक दोष सुधारण्यास परवानगी दिली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| | नामनिर्देशनपत्र छाननी प्रक्रिया | |
| १. | नामनिर्देशन पत्रांची छाननी स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | छाननीवेळी संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गंभीर स्वरुपाच्या दोषावरुन नामनिर्देशन पत्र नामंजूर केलेले आहेत किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रावर नामंजूर/मंजूर शेरा नमुद करुन स्वाक्षरी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ४. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राप्त आक्षेपांची संक्षिप्त चौकशी केली आहे किंवा कसे ?, | होय/नाही. |
| ५. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी म्हणने सादर करण्यास संबंधीत नामनिर्देशीत व्यक्तीस संधी दिली किंवा कसे ? | होय/नाही. |
| ६. | संधीची मुदत संपल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे ? | होय/नाही. |
| ७. | छाननी कामकाजाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी इतिवृतांत केला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ८. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामंजूर नामनिर्देशन पत्रांबाबत संबंधीत उमेदवारास नामंजूरीच्या कारणांसह लेखी कळवले आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| | उमेदवारी मागे घेणे प्रक्रिया | |
| १. | उमेदवारी माघारीकरीता संबंधीत उमेदवाराने नमुना ई ६ मधील नोटीसीवर स्वाक्षरी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | नोटीस संबंधीत उमेदवाराने स्वत अथवा सुचकामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर सादर केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | नोटीस सादर करण्याकरीता संबंधीत उमेदवाराने सुचकास लेखी स्वरूपात प्राधिकृत केले आहे किंवा कसे ? | |
| ४. | नोटीस स्वीकारतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नोटीशीचा खरेपणा व नोटीस देणाऱ्या व्यक्तीची ओळखीबाबत खात्री केली आहे किंवा कसे ? | |
| ५. | नोटीस दुपारी ३.०० वाजण्यापुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासमोर सादर झाली किंवा कसे ? | |
| ६. | नोटीशीवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिनांक, वेळ नमुद करुन स्वाक्षरी केली आहे किंवा कसे ? | |
| ७. | नोटीस रद्द करण्याची मुभा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे किंवा कसे ? | |
| | निवडणूक चिन्ह वाटप प्रक्रिया | |
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वानुसार निवडणूक चिन्ह वाटप केले आहे किंवा कसे ? | |
| २. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वाटप चिन्ह संबंधीत उमेदवारास कळवले किंवा कसे ? | |
| ३. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी भारतीय निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेले मुक्त चिन्ह वाटप केले आहे किंवा कसे ? | |
| ४. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अंतीम उमेदवारांची चिन्हांसह ई ७ नमुन्यातील यादी वर्णानुक्रमानुसार प्रसिध्द केली आहे किंवा कसे ? | |
| | शेरा | |

दिनांक - निवडणूक निरिक्षक यांची स्वाक्षरी

******************************************************************************

**अहवाल क्र. २**

**(मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक निरिक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | सहकारी संस्थेचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरिक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | मतदान पुर्व व्यवस्थापन | |
| १. | छपाई करण्यात आलेल्या मतपत्रिका अचुक आहेत किंवा कसे ? | |
| २. | मतपत्रिकेवरील उमेदवारांचे नाव व वाटप चिन्ह अचुक आहे किंवा कसे ? | |
| ३. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पुरेसे व सोईचे मतदान केंद्र उभारले आहेत किंवा कसे ? | |
| ४. | मतदान केंद्रावर पुरेसा अधिकारी/कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती केली आहे किंवा कसे ? | |
| ५. | संवेदनशील मतदान केंद्र शोधून त्या ठिकाणी अनुभवी व जबाबदार अधिकारी / कर्मचारी आणि आवश्यक | |

| | | |
|---|---|---|
| | शांतता व सुव्यवस्थेकरीता पोलीस बंदोबस्ताचे नियोजन केलेले आहे काय? | |
| ६. | मतदान केंद्रावर येणा-या मतदारांकरीता व मतदान केंद्रावरील नियुक्त कर्मचा-यांकरीता पिण्यासाठी पुरेसे व स्वच्छ पाण्याची व्यवस्था होती काय? | होय/नाही |
| ७ | मतदान केंद्रावर येणा-या अपंगांना व्हीलचेअरसह मतदान केंद्रावरील कक्षापर्यंत जाण्याकरीता Ramp ची व्यवस्था होती काय ? | |
| ८ | मतदान केंद्रावर येणा-या मतदारांकरीता व मतदान केंद्रावरील नियुक्त कर्मचा-यांकरीता स्वच्छतागृहाची सुविधा होती काय? | |
| | अंतिम मतदार यादी व्यवस्थापन | |
| १. | मतदानावेळी वापरण्यात येणारी अंतीम मतदार यादी व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी अंतीम केलेली मतदार यादी एकच आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| | मतदान प्रक्रिया | |
| १. | मतदान निर्धारीत वेळेत सुरू झाले किंवा कसे ? | होय/नाही |
| २. | मतदान केंद्रावरील व्यवस्था अचुक आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| ३. | मतदानावेळी मतदारांची ओळख पटवली जाते किंवा कसे ? | होय/नाही |
| ४. | मतदानाची टक्केवारी प्रत्येक दोन तासानंतर प्राधिकरणास अवगत करणे. | [illegible] |
| ५. | मतदान प्रक्रिया मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे विहीत वेळेमध्ये बंद करण्यात आली आहे काय ? | होय/नाही |
| ६. | मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद केल्या आहेत किंवा कसे ? | होय/नाही |
| ७. | मतदानानंतर मतपत्रिकांचा हिशोब मतदान प्रतिनिधींना दिला किंवा कसे ? | होय/नाही |
| ८. | मतदान समाप्त अहवाल प्राधिकरणास अवगत करणे. | संक्षिप्त अहवाल |
| ९. | मतदानानंतर त्याच दिवशी मतमोजणी नसल्यास व मतदान आणि मतमोजणीचे ठिकाण वेगळे असल्यास सील बंद मतपेटयांच्या वाहतूकीचा आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय ? | |
| १०. | मतमोजणीचे ठिकाणी सीलबंद मतपेटया सुरक्षीत ठेवण्याकरीता कक्ष (Strong Room) तयार करून त्या ठिकाणी सी.सी.टि. व्ही. आणि त्याच्या थेट प्रक्षेपणासाठी पडदा याची व्यवस्था केली आहे का ? | |
| ११. | मतमोजणीचे ठिकाणी सीलबंद मतपेटया सुरक्षीत ठेवण्याकरीता करण्यात आलेला कक्ष (Strong Room) निर्मनुष्य करून पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेला आहे काय ? | |
| ११. | **मतदान प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर मतपेटया सील बंद करुन सुरक्षित ठिकाणी पोहेचल्याचा अहवाल प्राधिकरणास अवगत करणे.** | संक्षिप्त अहवाल |

दिनांक -

निवडणूक निरिक्षक यांची स्वाक्षरी

********************************************************************************

## अहवाल क्र. ३

## (मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक निरिक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | सहकारी संस्थेचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरिक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | मतमोजणी प्रकियेचे निरिक्षण करणे | |
| १. | मतमोजणी निर्धारीत वेळेवर सुरु झाली किंवा कसे ? | होय/नाही |
| २. | मतमोजणीकरीता निर्धारीत करण्यात आलेले ठिकाण हे पुरेसा प्रकाश, पुरेशी खेळती हवा आणि आरोग्यवर्धक आणि पुरेशी आहे काय ? | |
| ३. | मोहरबंद मतपेटया मतमोजणी प्रतिनिधी समक्ष उघडल्या आहेत किंवा कसे ? | होय/नाही |
| ४. | मतपेटीतील मतपत्रिका हिशोबांशी जुळते किंवा कसे ? | होय/नाही |
| ५. | निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मतदान केंद्रनिहाय मतमोजणी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| ६. | मतमोजणी प्रतिनिधीच्या समक्ष होते किंवा कसे ? | होय/नाही |
| ७. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी बाद मतपत्रिकांवर बाद असे अक्षर नोंदवून बाद केल्याचे संक्षिप्त कारण नमुद केले आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| ८. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणी सतत सुरू ठेवली किंवा कसे ? | होय/नाही |
| ९. | मतमोजणी तहकुब केली आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| १०. | तहकुब मतमोजणी निर्धारीत वेळेत सुरू झाली किंवा कसे ? | होय/नाही |
| ११. | कोणत्याही मतपेटीत फेरफार झालेला नाही अशी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी खात्री केली आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| १२. | मतमोजणी झाल्यानंतर नमुना ई १६ मधील निकाल पत्रात अचुक नोंदी होत आहेत किंवा कसे ? | होय/नाही |
| १३. | उमेदवारांना सारखी मते पडल्यास चिटटया काढून निकाल जाहिर होतो किंवा कसे ? | होय/नाही |
| १४. | फेर मतमोजणी करीता लेखी मागणी झाली होती किंवा कसे ? | होय/नाही |
| १५. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निकाल घोषित केला किंवा कसे ? | होय/नाही |
| १६. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जि.स.नि.अ व प्राधिकरणास निकाल सादर केला आहे किंवा कसे ? | |
| | आचार संहिता अंमलबजावणी | |
| १. | नामनिर्देशन सुरू होण्याच्या दिनांकापासून ते मतदान संपेपर्यंत या कालावधीत संबंधीतांकडून आचार संहितेचे पालन होते किंवा कसे ? | होय/नाही |
| २. | आचार संहितेच्या कालावधीत संस्थेचे वाहन व विश्रामगृह (असल्यास) उमेदवारांकडून वापरले जात आहे किंवा कसे ? | होय/नाही |
| ३. | आचार संहिता कालावधीत संस्थेच्या सेवकांचा | |

| | | |
|---|---|---|
| | निवडणूकीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग होता किंवा कसे ? | |
| ४. | जाहिर प्रचार मतदान सुरू होण्यापुर्वी २४ तास अगोदर बंद झाला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराध | | |
| १. | निवडणूकी दरम्यान भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराध झालेत किंवा कसे ? | होय/नाही. |
| कायदा व सुव्यवस्था व्यवस्थापन | | |
| १. | मतदान व मतमोजणीवेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवल्यास प्राधिकरणास अवगत करणे. | संक्षिप्त अहवाल |
| मतदान व मतमोजणी प्रशिक्षण | | |
| १. | निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले आहे किंवा कसे ? | होय/नाही. |

दिनांक -

निवडणूक निरिक्षक यांची स्वाक्षरी

**********************************************************************

**अहवाल क्रमांक ४**

**(नि.नि.अ. यांनी मतदाना संदर्भात प्रतिआदेश दिल्यानंतर मतदानानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक निरिक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | सहकारी संस्थेचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरिक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| मतदानापुर्वी उमेदवाराचे निधन होणे | | |
| १. | मतदानापुर्वी उमेदवाराचे निधन झाल्याच्या खात्री अंती मतदानाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रत्यादेश दिल्याची बाब प्राधिकरणास अवगत करणे. | संक्षिप्त अहवाल |

दिनांक -

निवडणूक निरिक्षक यांची स्वाक्षरी

**********************************************************************

१७/०३/२०२०
(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.